प्रस्तावना :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार २ युनिट Backhoe Loader उपलब्ध करुन करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार २ युनिट Backhoe Loader उपलब्ध हे केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त साो.यांनी दि.९/०३/२०२३ रोजी मान्यता दिली असता फेर-२,दि.३०/०५/२०२३ ते दि.१०/०६/२०२३ या कालावधीत निविदा प्रसिध्द केली असता ३ निविदाकार प्राप्त झाल्याचे केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर निदर्शनास आले होते.

केंद्र शासन जीईएम पोर्टलवर २ युनिट Backhoe Loader उपलब्ध होणेसाठी प्राप्त ३ निविदाकार यांचे अटी-शर्तींनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा.निविदा समिती समक्ष करण्यात आली असता ३ पैकी एकच निविदाकार पात्र झाल्याने पात्र निविदाकार यांचे लिफाफा क्र.२ खुले करणेसाठी शासन निर्णय क्र.४.४.३.१. निविदा कालावधीत मुदवाढी मध्ये निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी ३ निविदा प्राप्त असणे आवश्यक आहे तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास संबंधित खरेदी अधिका-यांने प्रथम किमान एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी अशी मुदवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-याद्या एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी.त्यानंतर कोणताही मुदवाढ देण्यात येऊ नये.

शासन निर्णयानुसार पात्र निविदाकार यांचे लिफाफ क्र.२ खुले करण्यात आले असता मे.Doosan Bobcat India Private Limited,यांनी दोन युनिट Backhoe Loader पुरवठा करणेसाठी रु.६१,४०,०००/- असे खर्च सादर केला असुन दोन युनिट Backhoe Loader साठी रु.६१,३८,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असुन जीईएम पोर्टल वरिल प्राप्त निविदाकार यांनी सादर केलेला खर्च हा रु.२०००/- इतका जास्त असल्याने याकामी मा.आरोग्य अधिकारी साो. यांनी मे.Doosan Bobcat India Private Limited,यांचेशी दुरध्वनी द्वारे संपर्क साधला असता संबंधित निविदाकार यांनी दोन युनिट Backhoe Loader करिता रु.६१,३५,०००/- इतका खर्च सादर करुन तस लेखी स्वरुपात आरो‍ग्य विभाग येथे सादर असता त्यास मा.आयुक्त साो. यांनी दि.४/०७/२०२३ मान्यता दिली

तथापि घनकचरा प्रकल्प अहवालानुसार दोन युनिट Backhoe Loader पुरवठा करणेसाठी जीईएम पोर्टलवर प्राप्त झालेले निविदाकार मे.Doosan Bobcat India Private Limited, यांनी

रु.६१,३७,०००/- इतका खर्च सादर केला असुन सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** 226 **दि.** 0 /09 **/२०२३**

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार मे.Doosan Bobcat India Private Limited,यांचेशी दुरध्वनी द्वारे संपर्क साधला असता संबंधित निविदाकार यांनी दोन युनिट Backhoe Loader करिता रु.६१,३७,०००/- इतका खर्च प्राप्त खर्चास व निविदाकाराक मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार दोन युनिट Backhoe Loader पुरवठा करणेसाठी जीईएम पोर्टलवर प्राप्त झालेले निविदाकार मे.Doosan Bobcat India Private Limited, यांनी रु.६१,३७,०००/- इतका खर्च सादर केला असुन प्राप्त खर्चास व निविदाकारास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

प्रस्तावना :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर उपलब्ध करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन हे केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि.९/०३/२०२३ रोजी मान्यता दिली असता दि.०६/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२२ या कालावधीत निविदा प्रसिद्ध केली असता याकामी १ निविदाकार प्राप्त झाली असता दि.१६/०३/२०२३ ते दि.२३/०३/२०२३ या कालावधी मुदतवाढ करण्यात आली असता सदर निविदेसाठी पुन्हा एकच निविदाकार प्राप्त झालेचे दिसुन आले असता दि.२७/४/२०२३ ते दि.८/५/२०२३ रोजी याकालावधीत फेर-२ निविदा मागविले असता ०१ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर निदर्शनास आले होते.

केंद्र शासन जीईएम पोर्टलवर १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध होणेसाठी प्राप्त १ निविदाकार यांचे अटी-शर्तींनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा.निविदा समिती समक्ष करण्यात आली असता १ निविदाकार पात्र यांचे आर्थिक बोलींचा लिफाफा खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे त्यांनी एकुण खर्च सादर केले आहे.

| कामाचा तपशील | मे. बीईएमएल लिमिटेड,मुंबई |
|---|---|
| घनकचरा प्रकल्प १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध करुन घेणे बाबत. | १ युनिट चैनवाला बुलडोझर करिता एकूण खर्च रु.१,७३,३७,७४०/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध करुन घेणे करिता मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी रक्कम रु.१,७३,३७,७४०/- मात्र भरली आहे.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध करुन घेणेकरिता रु.१,६७,९९,९९८/- इतक्या खर्चास मान्यता असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्च रु.१,७३,३७,७४०/- मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी सादर केल्याने प्राप्त झालेले दर हे निविदे मधील दरा पेक्षा रक्कम रु.५,३७,७४२ /- इतकी रक्कमेने जास्त भरली असल्याने मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी सादर केलेल्या एकुण खर्चा पैकी रु.५,३७,७४२/- इतका अतिरिक्त खर्च द्यावा लागणार असल्याने वाटाघाटी अंती संबंधिताना निविदे मध्ये सादर केलेले दर अंतिम असल्याचे पत्र मनपास सादर केले आहे.

तथापि याकामी चैनवाला बुलडोझर (मॉडेल नं.बीडी-८०) घेणे बाबत विभागाने सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील रु.१,६७,९९,९९८/- इतका खर्च व स्पेसिफिकेशन प्रस्तावित करण्यात आले होते.याबाबत कार्यकारी अभियंता तथा कनिष्ठ अभियंता (घ.व्य.प्र.) यांनी जीईएम पोर्टलवर दि.५/०३/२०२३ रोजी जीईएम पोर्टलवर या मॉडलची किंमत पुनश्च तपासणी केली असता रु.१,७७,००,०००/- इतकी किमत नमुद आहे.

जीईएम पोर्टलवर प्राप्त निविदाकार मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी रु.१,७३,३७,७४०/- असे सादर केले असल्याने पुनश्च तपासणी मधील प्राप्त खर्चापेक्षा कमी सादर केले आहेत.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापन या लेखा शिर्षका खाली रु.१९ कोटी मंजुर असुन सदर तरतुद निधी मधुन अतिरिक्त खर्च रु.५,३७,७४२/- इतका प्रस्तावित करण्यात येत आहे. सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** 224 **दि.** ll/04/**२०२३**

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध करुन होणेकरिता मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी रु.१,७३,३७,७४०/- इतक्या प्राप्त खर्चास व निविदाकाराक मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट चैनवाला बुलडोझर (मॉडेल नं.बीडी-८०) घेणे बाबत प्रस्तावित प्रमाणे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील रु.१,६७,९९,९९८/- इतका खर्च व स्पेसिफिकेशन सादर केल्याने दि.५/०३/२०२३ रोजी जीईएम पोर्टलवर या मॉडेलची किमत तपासणी केली असता रु.१,७७,००,०००/- इतकी किमत नमुद आहे.

जीईएम पोर्टलवर प्राप्त निविदाकार मे.बीईएमएल लिमिटेड,मुंबई यांनी रु.१,७३,३७,७४०/- इतकी किमंत सादर करुन पुनश्च तपासणी मध्ये प्राप्त खर्चापेक्षा कमी आहे.

१ युनिट चैनवाला बुलडोझर मशिन उपलब्ध करुन होणेकरिता मे.बीईएमएल लिमिटेड, मुंबई यांनी रु.१,७३,३७,७४०/- इतका खर्च मनपाच्या अंदाजित खर्चा पेक्षा रु.५,३७,७४२/- ने जास्त असल्याने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापन या लेखा शिर्षका खाली रु.१९ कोटीच्या तरतुद निधी मधुन खर्च रु.५,३७,७४२/- इतक्या अतिरिक्त खर्चास व प्राप्त दरास तसेच निविदाकारास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**